वाचा :- 1.**शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रंमाक एनएपी**-2016/**प्र.क्र** 7/**टी**-1/**मंत्रालय मुंबई**
दिनांक 22/01/2016

2. मा. आयुक्त महानगर पालिका औरंगाबाद यांचा बांधकामाचा परवाना क्रमांक 1084/2017-18 फाईल क्रं 834/17/2017-18 दिनांक 21/03/2018.

3. अर्जदार मे घृष्णेश्वर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री गणेश अण्णाराव माळकर व श्री दत्तविजय रामलिंग गुळवे यांचा अर्ज दिनांक 06/02/2018.

दिनांक 26/03/2018

जा.क्र. 2018/**जमा**-2/**परि.ब.**/**सिआर**-23

<u>परिशिष्ट ब</u>

महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम - 42 अ मधील तरतुदीअन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे अशा जमीनीच्या भोगवटदारास दयावयाची सनद

ज्याअर्थी जिल्हा औरंगाबाद तालुका औरंगाबाद मौजे **मिटमिटा** च्या सर्व्हे क्रं/गट क्रं/न.भु.क्रं/सि.स.न. **267** मधील क्षेत्रफळ **3940.00 चौ मी** या जमीनीच्या भोगवदाराने महाराष्ट जमीन महसुल संहिता 1966 च्या कलम 42-अ च्या तरतुदींन्वये मौजे **हर्सुल** या **निवासी**/वाणिज्य/अन्य अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमीनीचा विकास करण्यास महानगरपालिका औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश परवाना क्रमांक 1084/2017-18 फाईल क्रं 834/17/2017-18 दिनांक 21/03/2018 अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्या संबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजुर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद अकृषीक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम चालन क्रं **MH012380495**201718**M** रक्कम रुपये **21,276/-** (अक्षरी **एकविस हजार दोनशे शहयात्तर फक्त**) दिनांक 26/03/2018 रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तीना अधीन राहुन उपरोक्त जमीनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमीनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम 42-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1. आकारणी : उक्त जमीनीचा भोगवटदारा उक्त जमीनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक 31 जुलै 2018 (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमींच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रु.0.90 पैसे निवासी प्रयोजनासाठी प्रति चौ मी या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकारी यांचे कडुन वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल, अशी सुधारीत आकारणी देईल.
2. उक्त जमीनीचा भोगवटदार उक्त जमीनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर,दर आणि उपकर भरील.
3. वरिल मंजुर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजुरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहीती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडुन मंजुर झाल्यापासुन 30 दिवासांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहील.
4. उक्त जमीनीच्या भोगवटदाराने पुर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्या जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीनी भोगवटादार याच्या वहिवाटीत असल्याचे चालु ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणुन अपर तहसिलदार औरंगाबाद या ठिकाणी महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा 26/03/2018 रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

श्री गणेश अण्णाराव माळकर

श्री दत्तविजय रामलिंग गुळवे

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे

1.सुनिल उत्तमराव काळे

2.शिवाजी जयंतराव वेताळ

आम्ही जाहिर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: म्हणुन स्वाक्षरी केलेली आहे ती, मे घृष्णेश्वर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री गणेश अण्णाराव माळकर व श्री दत्तविजय रामलिंग गुळवे व्यक्ती तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या व पदनामे

1.सुनिल उत्तमराव काळे

2.शिवाजी जयंतराव वेताळ

सही/-
रमेश मुंडलोड
अपर तहसिलदार औरंगाबाद

प्रतिलीपी :- (माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव)

1. मा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्त्व सविनय सादर.
2. मा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद.
3. सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद.
4. अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद.
5. नगर भुमापन अधिकारी औरंगाबाद.
6. अर्जदार मे घृष्णेश्वर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री गणेश अण्णाराव माळकर व श्री दत्तविजय रामलिंग गुळवे रा औरंगाबाद ता जि औरंगाबाद.
7. तलाठी साझा मिटमिटा ता जि औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

रमेश मुंडलोड
अपर तहसिलदार औरंगाबाद
अपर तहसिलदार,औरंगाबाद